# जाहीरात

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सर्व विभागांमध्ये मानद तत्वावर रा. प. नाशिक विभागात ०३ (तीन) समुपदेशक पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A. Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदविका (Advance Diploma in psychology) |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निम शासकीय / मोठ्या खाजगी संस्थांमधील किमान २ वर्षांचा अनुभव |
| इतर अटी व शर्ती | रा. प. महामंडळाच्या विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरिता मासिक मानधन रु.४०००/- देण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणूक देण्यात येईल. सदर कालात केलेल्या कामाचा आढावा घेऊन पुढे सदर नेमणूक चालू ठेवण्याची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांमध्ये समुपदेशनाद्वारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तीक संवाद साधून, अडीअडचणी समजाऊन घेऊन वैयक्तीक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे. तसेच आगारास महिन्यातून किमान ३ वेळा भेटी देणे. |
| नेमणुकीचा कालावधी | सदर नेमणूक निव्वळ मानद तत्वावर असून नेमणुकीचा कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाच्या कार्यकाल विचारात घेऊन नेमणुकीचा कालावधी विभागामार्फत वाढविण्यात येईल.<br>सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामाऊन घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार / हक्क अर्जदारास / समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी / नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पद्धती | वरील अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवाराने फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखित करून स्वत:चा फोटो त्यावर चिटकवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याबाबतचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र व अनुभवाचा दाखला जोडावा. सदर अर्ज आपण या विभागात समुपदेशक म्हणून काम करण्यास इच्छुक असाल तर रा.प. नाशिक विभागाच्या "विभाग नियंत्रक" यांच्या नावे विभागीय कार्यालय यांचेकडे दि. २६/१२/२०२४ पर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावा. याबाबत अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, एन. डी. पटेल रोड, शिंगाडा तलाव, गडकरी चौक, नाशिक ४२२००१ या कार्यालयाशी संपर्क साधावा. |

Mahabharti.in